# आगामी ह्रुमॅटॉलॉजी: आशा आणि अपेक्षा

**डॉ. श्रीकान्त वाघ, संधिविकार विशेषज्ञ, पुणे**

गेल्या पंधरा-वीस वर्षात ह्रुमॅटॉलॉजीच्या क्षेत्रात अनेक महत्वाचे बदल झाले. रोगनिदानाची पध्दत सुधारली, औषधांच्या वापराविषयी मार्गदर्शक तत्त्वे आली, नवनवीन औषधे उपलब्ध होऊ लागली. त्यामुळे आजाराचे निदान आणि उपचार आमूलाग्र बदलले. या साऱ्याचा संधिवाताच्या रुग्णांनाही फायदा होऊ लागला. जे योग्य अशा विशेषज्ञाकडे वेळेवर पोचले, त्यांचा आजार नियंत्रित झाला. काही रुग्णांमध्ये औषधांचे प्रमाण कमी झाले, तर काहींची औषधे पूर्णपणे बंद झाली.

काळ पुढे सरकतो तसे विज्ञानही पुढे-पुढे जात रहाते. काही जुन्या गोष्टी मागे पडतात, त्यातल्या काहींची नवी ओळख पटते, तर काही नव्या गोष्टी उभारी घेतात. ह्रुमॅटॉलॉजी हे देखील आधुनिक विज्ञान आहे. म्हणूनच या शास्त्राचा आगामी काळ आश्चर्यकारक प्रगतीचा असेल यात शंका नाही.

जगात सगळीकडेच ह्रुमॅटॉलॉजिस्ट तज्ज्ञांची कमतरता आहे. ऑस्ट्रेलियात ह्रुमॅटॉलॉजिस्टच्या भेटीसाठी सहा महिने थांबावे लागते. भारतातही ही उणीव जाणवते. शिवाय हे सारे तज्ञ मोठ्या शहरांमध्ये असतात. आपल्या महाराष्ट्रातल्या ३५ जिल्हयांमधल्या ३५८ पैकी बहुसंख्य तालुके असे आहेत की जेथे कोणी ही ह्रुमॅटॉलॉजिस्ट विशेषज्ञ नाही. हल्ली बहुतेक लोकांकडे मोबाइल फोन असतात. कोरोनाकाळात मोबाइल फोनवरून वैद्यकीय सल्ला देण्याची प्रथा आपल्याकडे सुरु झाली. या पध्दतीला काही मर्यादा असल्या तरी त्यामुळे संधिवाताच्या अनेक रुग्णांना या काळात योग्य तो सल्ला मिळू शकला. प्रवासाचा त्रास, वेळ आणि खर्च वाचले. पुढे टेलिमेडिसीन विषयी नियमावली ठरवून त्याला शासकीय मान्यता मिळाली. या दूरस्थ प्रणालीमुळे रुग्णांचा आजार नियंत्रणात आहे किंवा नाही यावर सहजपणे लक्ष ठेवता येईल. या पद्धतीचा प्रसार जसजसा होत जाईल तसतसे अधिकाधिक रुग्णांना विशेषज्ञांचा सल्ला सुलभतेने मिळेल आणि त्यांचा आजार सहजपणे नियंत्रणात येऊ शकेल.

भारतात गावोगावी विविध वैद्यकप्रणालींचे अनेक डॉक्टर्स सेवा करीत असतात. त्यांना काही प्रशिक्षण मिळाले तर ते संधिवाताच्या रुग्णांकडे अधिक जागरुकतेने पाहू शकतील. विदेशात नर्स-प्रॅक्टिशनर्स आणि सहाय्यक डॉक्टरांचा सहभाग वाढवून संधिवाताच्या सामान्य रुग्णांची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्याविषयी विचार केला जातो. आयुर्वेद - होमिओपॅथीच्या सहा लाखांपेक्षा अधिक डॉक्टरांना प्रशिक्षण दिले तर अनेक रुग्णांवर शहरातला

ह्युमॅटॉलॉजिस्ट गाठायची वेळ येणार नाही आणि ह्युमॅटॉलॉजिस्ट तज्ज्ञ त्यांच्याकडे आलेल्या गुंतागुंतीच्या रुग्णांसाठी आवश्यक तितका वेळ देऊ शकतील.

‘आजाराचा उपचार’ आणि ‘रुग्णाचा उपचार’ यात फरक आहे. रुग्णकेंद्रित प्रणालीत उपचारांची दिशा ठरवताना रुग्णाचा सहभाग डॉक्टरांइतकाच महत्त्वाचा असतो. आयुर्वेदाच्या काळात देखील आजाराच्या उपचारांमध्ये रुग्णाचे महत्त्व वर्णन केले आहे. प्रगत देशांमध्ये औषधोपचारांचे फायदे तोटे रुग्णाला समजावून सांगतात आणि त्याने संमति दिली तरच ते उपचार सुरू करतात. एखाद्या रुग्णाचा संधिवात नियंत्रणात येत नाही म्हणून औषधे बदलायची किंवा वाढवायची असली तरी पुन्हा संमति लागते. स्वतःची गरज, दुखणे सहन करण्याची क्षमता, औषधांच्या दुष्परिणामांबद्दल वाटणारी काळजी, कुटुंबियांचा आधार, आर्थिक परिस्थिती अशा विविध गोष्टींचा विचार करून रुग्ण एखादे औषध घ्यायचे की नाही याविषयी निर्णय घेतात. उपचारांविषयीच्या निर्णयप्रक्रियेत रुग्णांचा सहभाग आगामी काळात वाढत जाणार आहे आणि त्याच्या निर्णयाचा मान राखणे हे डॉक्टरांना अत्यावश्यक ठरणार आहे.

वैद्यकीय विम्यावरील सरकारी कर कमी करण्याविषयी सध्या चर्चा चालू आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह असलेल्या व्यक्तिंसाठी काही अटीशर्तीवर विमा उतरवता येतो. संधिवाताच्या रुग्णांसाठी मात्र ती सुविधा उपलब्ध नाही. विमा स्वस्त तर झालाच पाहिजे तसेच तो सरसकट सर्वांना लागू झाला पाहिजे. प्रत्येक शासकीय रुग्णालयात ह्युमॅटॉलॉजीचा स्वतंत्र विभाग असला तर रुग्णांच्या खिशाला परवडतील असे उपचार होऊ शकतील.

औषधे आणि रोगनिदान या विषयांवर जगभर खूप संशोधन होत आहे. विज्ञाननिष्ठ संशोधन हो एक सतत चालू रहाणारी प्रक्रिया आहे. त्यातून नवनवी औषधे सापडतात. अर्थात एखादे औषध बाजारात येण्यास ८-१० वर्षांचा कालावधी जातो. अशी औषधे महाग असल्याने ती सर्वसामान्यांच्या आवाक्यातली नसतात. त्यासाठी 'रिव्हर्स फार्माकॉलॉजी' हा उपाय. देशी वैद्यकात जी औषधे उपयुक्त ठरतात त्यांवर आधुनिक पध्दतीने संशोधन केल्यास संशोधनाचा खर्च आणि त्यासाठीचा कालावधी यांत पुष्कळ बचत होऊ शकते. शासनाचे आयुष मंत्रालय अशा संशोधनास प्रोत्साहन देत असल्याने त्यातूनही काहीतरी सकारात्मक निष्पन्न होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

आजाराचे निदान करण्यासाठी, औषधांची उपयुक्तता तपासण्यासाठी, तसेच उपचारांची परिणामकारकता ठरवण्यासाठी काही बायोमार्कर्स असतात. आगामी काळात असे घटक निश्चित होऊ शकतात. ‘व्यक्ति तितक्या प्रकृति' हे तत्त्व आजारालाही लागू असल्याने, रुग्णागणिक वेगवेगळे आणि खात्रीशीर औषध ठरवणे शक्य होऊ

शकेल. कूर्चेची झीज होणाऱ्या संधिवाताचे (Osteoarthritis) उपचार शिकवताना वीस वर्षांपूर्वी आमचे गुरु डॉ. व्ही. आर. जोशी एक काळी स्लाइड दाखवत. सारा अंधार, उपचार नाहीच - असे सांगणारी. आज योग्य वेळी निदान झालेल्या अशा रुग्णांसाठी स्टेम सेल थेरपी उपलब्ध होऊ लागली आहे. कूर्चेच्या जागी भार सहन करू शकणारे विशिष्ट प्रकारचे रबर बसवण्याच्या तंत्राला अलिकडेच मान्यता मिळाली आहे. शस्त्रक्रियांची नवनवीन तंत्रे येत आहेत. आधुनिक वैद्यकाची सर्वांगीण प्रगती होत असताना ह्युमॅटॉलॉजी मागे कशी राहील?

आजाराचे लवकर आणि अचूक निदान तसेच व्यक्तिसापेक्ष सुरक्षित उपचार यांची आगामी काळात आशा करीत असताना ते आपल्याकडील सर्वच रुग्णांना सहजतेने मिळतील अशी अपेक्षा करू या.